आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२७ नोव्हेंबर २०२४ - बुधवार

<u>ठळक बातम्या</u>

- हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- उद्योगपती गौतम अदानी यांच्यावरचे लाचखोरीचे आरोप गंभीर असून त्यांना अटक करावी, अशी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी

- राज्यात सत्तास्थापनेबाबत अद्याप निर्णयाची प्रतीक्षा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज भूमिका स्पष्ट करणार

- बालविवाह मुक्त भारत अभियानाला आजपासून देशभरात सुरुवात

- ४३ व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचा आज समारोप

**<><><><><>**

अदानी उद्योग समूहाच्या लाचखोरी प्रकरण आणि विविध मुद्यांवरून विरोधकांच्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर सभागृहात अदानी प्रकरण तसंच उत्तर प्रदेश आणि मणिपूरमधला हिंसाचार या मुद्द्यांवरून गदारोळ झाला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना सदनाचं कामकाज चालवण्यासाठी सभागृहाचे शिष्टाचार आणि प्रतिष्ठा राखण्याची वारंवार विनंती केली. प्रश्नोत्तराच्या तासानंतर सर्व मुद्द्यांवर चर्चा केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. मात्र, विरोधकांनी सभागृहाच्या हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू ठेवली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करत आपला विरोध सुरू ठेवला. यामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत, सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनखड यांनी अदानी लाचखोरी प्रकरण, तसंच उत्तरप्रदेशातल्या संभल आणि मणिपूर हिंसाचार प्रकरणी विरोधकांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव फेटाळला. धनखड यांनी सदस्यांना चर्चा करून सभागृहाचं कामकाज सु◌ुरु ठेवण्याचं आवाहन केलं. मात्र सभागृहात गोंधळ सुरु राहिल्यानं राज्यसभेचं कामकाज प्रथम साडे अकरा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेत लाचखोरीचे गंभीर आरोप असून त्यांना अटक करावी, अशी मागणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. संसदेच्या आवारात ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं हायस्पीड रेल्वेच्या निर्मीती आणि उत्पादनाचं काम सुरू केलं असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. इंटिग्रल कोच फॅक्टरीच्या सहकार्यानं हाय स्पीड रेल्वेची रचना तयार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. याचा उत्पादन खर्च प्रति डब्बा सुमारे २८ कोटी रुपये आहे. दुसऱ्या एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना रेल्वेमंत्र्यांनी सांगितले की, वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांचा वेग कमी करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही.

**<><><><><>**

समाज माध्यमावर प्रसारित होणारा अश्लील मजकूर रोखण्यासाठी सध्याचे कायदे आणखी मजबूत करणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. लोकसभेत आज पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना वैष्णव म्हणाले की, समाज माध्यम हे आजघडीला वृत्तपत्रीय स्वातंत्र्याचं मोठं माध्यम असलं तरी त्यावरच्या आशयाचं संपादन होत नसल्यामुळे अनेक प्रकारचे अश्लील मजकूर देखील प्रकाशित केले जातात. ओटीटी माध्यमावरच्या आशयाविषयीही बोलताना वैष्णव म्हणाले की, आपल्या देशाची संस्कृती आणि समाजमाध्यमांचा उगम ज्या देशातून झाला आहे, तिथली संस्कृती यात फरक आहे. त्यामुळे संसदेच्या स्थायी समितीने हा मुद्दा उचलून धरावा आणि त्यासाठी कठोर कायदे करावेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत देशातल्या ८० कोटी लोकांना लाभ झाला असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री निमुबेन बांभनिया यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. गरीब लाभार्थ्यांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी विनामूल्य अन्नधान्य वितरणाचा कालावधी जानेवारी २०२४ नंतर पाच वर्षांसाठी वाढवण्यात आला असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात सरकार स्थापनेबाबत अद्याप चित्र अस्पष्ट असून मुख्यमंत्री कोण होणार या निर्णयाची प्रतीक्षा कायम आहे. राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे थोड्याच वेळात वार्ताहर परिषद घेणार आहेत. त्यात ते याबाबत आपली भूमिका स्पष्ट करतील, त्यानंतर महायुतीतल्या मित्रपक्षांची बैठक होण्याची शक्यता आहे. तिन्ही पक्षांच्या शीर्षस्थ नेत्यांची भूमिका स्पष्ट झाल्यानंतर मुख्यमंत्रीपदाबाबत निर्णय होईल आणि त्यानंतर सरकार स्थापनेच्या हालचालींना गती येईल.

**<><><><><>**

विकसित भारत २०४७ च्या संकल्पाला जोडूनच बालविवाहमुक्त भारताचं लक्ष्य असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी म्हटलं आहे. गेल्या दहा वर्षांत महिला सक्षमीकरणासाठी सरकारनं लिंगभाव समानतेसाठी जेंडर बजेटसारखी विविध पावलं उचलली आहेत, असं त्या म्हणाल्या. दिल्ली इथं त्यांच्या उपस्थितीत आजपासून देशभरात बालविवाह मुक्त भारत अभियानाची सुरुवात झाली. बालविवाहासारख्या प्रथेचं देशातून समूळ उच्चाटन करणं, हा या अभियानाचा उद्देश आहे. या कार्यक्रमात बालविवाह मुक्त भारत पोर्टलची सुरुवात करण्यात आली. जागरुकता वाढवणं, तसंच बालविवाहासारख्या घटनांची त्वरीत माहिती मिळण्यासाठी या पोर्टलचा उपयोग होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रशासनाच्या महिला आणि बालविकास विभागाच्या बालविवाह मुक्त भारत मोहिमेच्याअंतर्गत धुळे जिल्ह्यात ग्रामपंचायतींनी बालविवाह प्रतिबंधक ठराव मंजूर केले. बालविवाह होणार नाही अशी सामुहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. निमगुळ या गावात ग्रामपंचायतीसमोर राबवलेल्या अभियानात ग्रामस्थांनी बालविवाह मुक्त भारत अभियानाची शपथ घेतली.

**<><><><><>**

४३ व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचा आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं समारोप होणार आहे. विकसित भारत @२०४७ ही या वर्षीच्या व्यापार मेळाव्याची संकल्पना आहे. या वर्षीच्या व्यापार मेळाव्याला जनतेचा उदंड प्रतिसाद मिळाला आहे. चीन, इजिप्त, इराण, दक्षिण कोरिया, थायलंड, तुर्की आणि यूएईसह अकरा देशांनीही या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात भाग घेतला. यावर्षी झारखंड हे मुख्य आकर्षण असलेले राज्य होतं तर बिहार आणि उत्तर प्रदेश हे भागीदार राज्य होते.

**<><><><><>**

५५ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फि चा उद्या समारोप होत असून आज आदल्या दिवशी सुमारे ७० चित्रपट दाखवले जाणार आहेत. यात तपन सिन्हा यांच्या हार्मोनियम या चित्रपटाचाही समावेश आहे. तपन सिन्हा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सिनेमातून गोष्ट सांगण्याच्या त्यांच्या अनोख्या शैलीवर अर्जुन चक्रवर्ती, एन मनू चक्रवर्ती आणि जेष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोर आपली मतं मांडणार आहेत. राज कपूर ,मोहम्मद रफी, तपन सिन्हा आणि अक्किनेरी नागेश्वर राव या भारतीय चित्रपट व्यवसायातल्या दिग्गजांवर यंदाच्या या महोत्सवात विशेष कार्यक्रम करण्यात आले. दरम्यान, प्रसिद्ध चित्रपट निर्माते आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा गुणवत्ता निश्चिती समितीनं यावर्षीच्या उल्लेखनीय चित्रपटांबद्दल बातमीदारांना माहिती दिली. ख्यातकीर्त गायिका लता मंगेशकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भारतातली संगीत रंगभूमी या विषयावर संगीतकार ए .आर. रहमान यांची मुलाखत देखील आयोजित करण्यात आली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तामिळनाडूच्या चार दिवसीय दौऱ्यावर असून या दौऱ्यासाठी त्यांचं कोइम्बतूर विमानतळावर आगमन झालं. त्या उद्या वेलिंग्टन उटी इथल्या संरक्षण सेवा कर्मचारी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर २९ नोव्हेंबर रोजी निलगिरी इथल्या आदिवासींशी संवाद साधणार आहेत. राष्ट्रपतींच्या दौऱ्यासाठी कोइम्बतूर आणि उटी परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

**<><><><>**

बंगालच्या उपसागरावर नैर्ऋत्य भागात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा गेल्या सहा तासात ताशी १३ किलोमीटर वेगाने उत्तरेकडे सरकला आहे. हे ठिकाण त्रिनकोमाली, नागपट्टीनम आणि चेन्नई या भागांपासून जवळ आहे. कमी दाबाचा पट्टा पुढच्या १२ तासात उत्तर-वायव्य भागाकडे सरकून त्याचं रुपांतर चक्रिवादळात होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><>**

फेंगल चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूच्या किनारी भागाला मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. तसंच आंध्र प्रदेशाच्या किनारपट्टीवरही मुसळधार पावसाची शक्यता आहे. मच्छिमारांनी पुढचे तीन दिवस बंगालच्या उपसागरात, तामिळनाडूच्या किनाऱ्यावर आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर न जाण्याचा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

**<><><><>**